स्थापना : १९६४

हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

# मासिक नवस्नेह

६१

वर्ष ११ वे : अंक ३
जून २०२५

स्वागतमूल्य
₹. 30/-



प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# भगवान श्री परशुराम जयंती, छ. शिवाजी महाराज जयंती उत्साहाने साजरी

## सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने श्री परशुराम पालखी सोहळा ! दहशतवादी हल्ल्याचा निषेध !



कोल्हापूर चित्पावन संघाच्या कार्यालयातील श्री परशुराम मंदिरात श्री. मुकुंद गोरे यांच्या हस्ते भगवान श्री परशुराम यांना अभिषेक घालण्यात आला. श्री. इंगळीकर गुरुजींनी पौरोहित्य केले. कात्यायनी मंदिरात श्री भगवान परशुराम अभिषेक संचालक श्री. श्रीकांत लिमये यांच्या हस्ते सकाळी संपन्न झाला. या कार्यक्रमाला तिन्ही संघाचे संचालक व कार्यकर्ते उपस्थित होते.



सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ रोजी श्री भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव आणि छ. शिवाजी महाराज जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गावरून पालखी सोहळा संपन्न झाला. तत्पुर्वी सकाळी ७ वाजता मंगलधाम येथे श्रींची जन्मकाळ सोहळा पार पडला. ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम, कोल्हापूर चित्पावन संघ आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या वतीने दरवर्षी साजरा होणारा श्री भगवान परशुराम जन्मोत्सव आणि शिवजयंती सोहळा, पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर यंदा साधेपणाने साजरा करण्यात आला. प्रथेनुसार बिनखांबी गणेश मंदिर येथे फुलांनी सजवलेल्या पालखीत श्री परशुरामांच्या पादुका, शिवछत्रपती आणि महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमा ठेवण्यात आल्या. यावेळी डॉ. नंदकुमार जोशी आणि डॉ. राधिका जोशी यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले. मंत्रोच्चारात आणि धार्मिक वातावरणात पालखी महाद्वार रोड, ताराबाई रोड, तटाकडील तालीम, निवृत्ती चौक, कोठीशाळामार्गे मंगलधाम येथे पोहोचली. त्यानंतर श्रींचा जन्मकाळ सोहळा महिलांच्या उपस्थितीत पार पडला. भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. पालखी सोहळ्यात दहशतवादी तसेच पाकिस्तानच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. तसेच निषेधाचे फलकही लावण्यात आले.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

मासिक नवस्नेह

# नवस्नेह

**वर्ष ११ वे : अंक ३ : जून २०२५**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) संपादकीय /४

२) ऋतू बरवा - वर्षा /५

३) चदंक्रांत गोखले - देवमाणूस /८
- संतोष द. पाटील

४) सोपानदेवांची अलौकिक सोपानदेवी /१०
- सौ. मंजुश्री गोखले

५) ज्ञानसूर्याची सावली /११
- सौ. मंजुश्री गोखले

६) मुलांचे पान /१४

७) ब्राह्मण आणि सरकारी अनुदान /१७
- श्रीकांत शिंत्रे

८) काश्मीर नक्की कोणाचे /२१
- श्रीपाद जोशी

९) शैक्षणिक पारितोषिक योजना २०२५ /२३

१०) शैक्षणिक अर्थसाहाय्य मागणीसाठी आवाहन /२४

११) वधूवर माहिती यादी /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५


- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611



**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ७ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

उन्हाळ्यातून पार पडला आहात ना? आता हा अंक हातात पडेपर्यंत कदाचित मान्सून दाराशी आला सुद्धा असेल किंवा येऊ घातला असेल. यावर्षी मान्सून लवकरच येणार आहे म्हणे ! अशा बातम्या वृत्तपत्रातून येत होत्या आणि आहेत. नुसत्या बातम्या वाचूनच किती बरं वाटलं होतं म्हणून सांगू. मग आता प्रत्यक्ष पाऊस आल्यावर काय होईल? आहाहा...! नुसत्या विचारानंच अंगावर शिडाकावा आल्यासारखं वाटलं. आता प्रत्यक्षात मान्सून कधी येतोय त्याची वाट बघूया !

मित्रांनो, गेल्या महिन्यात झालेला पहेलगाम इथला हल्ला म्हणजे पाकिस्तान हा माणुसकीला काळिमा फासणारा देश आहे हे सिद्ध करणारा होता. अर्थात त्यांच्याकडून दुसरी अपेक्षाच नव्हती म्हणा ! पण त्यानंतर भारताच्या तिन्ही सैन्यदलांनी जो काही पराक्रम केला, त्यानं पाकचं कंबरडंच मोडलं. या पराक्रमाला त्रिवार मुजरा आणि मानवंदना !!! अर्थात अचानक युद्धबंदी जाहिर करणं हा जागतिक राजकारणाचा भाग असला तरी ज्यांचे मेंदू गुडघ्यात आहेत त्यांना ही खेळी कळली नाही. कळणारही नाही. हे नुसतेच शिवाजी राजेंचे मावळे. त्यांच्या युद्धनितीचा कणभर जरी अभ्यास केला असता तरी भारताची युद्धनिती त्यांना कळली असती. पण हेच आपल्या देशाचं दुर्दैव आहे. न कळणारेच जास्त बडबडतात, म्हणून विन्स्टन चर्चिल म्हणाले असावेत ''भारत हा वाचाळवीरांचा देश आहे !'' नशिब एवढंच की आता वाचळवीर सत्तेबाहेर आहेत. आता थोड्याच दिवसांत भारताचा नकाशा बदलण्याचे चिन्ह आहे. आपण वाट बघूया.

या महिन्याच्या अंकात आपल्या नेहमीच्या लेखांसोबतच 'काश्मीर नक्की कोणाचे' हा अज्ञात पण महत्त्वाची माहिती देणारा लेख दिलेला आहे, तो तुम्हाला नक्कीच आवडेल.

मित्रांनो, आता पाऊस येईल. उन्हानानं होणारी तलखी कमी होईल. सगळी सृष्टी सुंदर दिसू लागेल. ती सुंदरता आपल्याही उतरवूया. ती उत्साहाची, आनंदाची, समृद्धीची हिरवाई आपल्या मनात उतरवूया. म्हणजे सृष्टीसोबत आपणही सुंदर दिसू. आपलं जीवनही सुंदर दिसेल. अर्थात,

**मत ढूँढो की दुनिया में खुबसुरत कौन है ।**
**देखना ही है, तो उसे देखो जिसे दुनिया सुंदर है ।।**

आणि असं दुनिया सुंदर करणारं पावसाशिवाय कोण आहे? तेव्हा आपण आता त्यालाच पाहू आणि तो सृष्टी सुंदर करतो आहे, आपण आपलं जीवन सुंदर करू. आपल्या भारतभचं रक्षण करण्यात आपले सैनिक आपल्या जीवाची बाजी तर लावतच आहेत, रक्षण केलेली आपली भारतभू सुंदर ठेवण्याची आपली सगळ्यांची जबाबदारी आपण निष्ठेनं, कर्तव्य समजून पार पाडूया. म्हणून तर सगळी सृष्टी सुंदर करणाऱ्या पावसाची वाट बघूया, त्याला आळवूया...

**येई जलदा, येई जलत, घेऊनिय तृप्तीचा हुंकार**
**टपटप थेंबाने उमटू दे या धरतीवर ॐकार !**
**वृक्ष पल्लवा मोहरू दे, गाऊ दे ओली गाणी**
**पानापानांतून निथळू दे, गंधित मोत्यांचे पाणी**

धन्यवाद !


आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००



**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**
**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# ऋतू बरवा... वर्षा

**आकाशी गडगडते म्हातारी का दळते ?**
**गडङ्गुडुम गडङ्गुडुम ऐकत ते राहू**
**ह्या गारा सटासटा आल्या चटाचटा**
**पट् पट् पट् वेचुनिया ओंजळीत घेऊ**
**फेर गुंगुनी धरू, भोवऱ्यापरी फिरू**
**ये पावसा, घे पैसा, गीत गोड गाऊ**
**पहा फुले, लता-तरू, चिमणी-गाय-वासरू**
**चिंब भिजती, मीच तरी, का घरात राहू !!**

बरोबर ओळखलत!!

आज आपण जाणून घेणार आहोत जीवनाचे गाणे..!! जीवन म्हणजे पाणी... अन् पाणी देणारा पाऊस वर्षा म्हणजेच मान्सून... पर्जन्यवृष्टी!!

पावसाळ्याची सुरुवात अशा वेळी होते ज्यावेळी त्याची खूप गरज असते, मोठ्या-मोठ्या शहरांना पाणी देणारे जलसाठे संपलेले असतात, गरमीचा पारा अगदी वर असतो, शेतकरी राजाला पावसाच्या आगमनाची प्रतीक्षा असते आणि त्यानंतर पावसाचे धुमधडाक्यात आगमन होते, आर्द्रतेने हवा जड होते आणि आकाश अनेकदा गडद ढगांनी भरलेले असते. पहिल्या पावसाचे थेंब तीव्र उष्णतेच्या समाप्तीचे संकेत देतात, ज्यामुळे लोक आणि निसर्ग दोघांनाही आराम आणि आनंद मिळतो.

पहिल्या पावसानंतर मातीचा सुगंधही फार निराळाच असतो,हे सारं वाचताना गाणं कोणतं आठवतं सांगा.

**दारी पाऊस पडतो, रानी पारवा भिजतो**
**आला आला ग, सुगंध मातीचा**
**बघ पागोळ्या गळती थेंब अंगणी नाचती**
**आला आला गं, सुगंध मातीचा**

हे सुमन कल्याणपूर यांनी गायिलेलं गाणं आठवलं ना? पाऊस असाच आहे. अनेक आठवणी नकळत जागवतो, विशेष करून बालपणीच्या आठवणी जास्तच!!

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे ज्येष्ठ आणि आषाढ या महिन्यात वर्षा ऋतू असतो, तर ग्रेगरीयन दिनदर्शिकेप्रमाणे जून उत्तरार्ध, जुलै, ऑगस्ट पूर्वार्ध या महिन्यात वर्षा ऋतू असतो. हा निसर्गाचा एक सुंदर आणि महत्त्वपूर्ण ऋतू आहे. शेती आणि आरोग्यासाठीही हा ऋतू खूप महत्त्वाचा आहे.

या काळात, हवामान थंड आणि दमट असते. या ऋतूत अनेक सण येतात त्यामुळे माणसाला शेती आणि निसर्गाला नवीन ऊर्जा मिळते.

भारत हा प्रामुख्याने कृषीप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था शेतीशी संबंधित असल्याने पिकांच्या उत्पादनासाठी पावसाळ्याचे महत्त्व भारतात विशेष आहे.

दक्षिणेतील समुद्रात तयार होणाऱ्या हवेच्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे भारतात नैऋत्य मोसमी वारे वाहू लागतात. दक्षिणेकडून हे वारे हळूहळू संपूर्ण भारतात पसरतात. याचे परिणामस्वरूप भारतात पाऊस पडतो ज्याला मान्सून असे म्हणले जाते.यामुळे भारताचा विचार करता अन्य राज्यांच्या तुलनेत दक्षिण भारतात अधिक पाऊस पडतो. भारतातील जैवविविधता आणि पावसाळा यांचे विशेष समीकरण आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला गायी, म्हशी गरोदर (गाभण) रहातात. तसेच वासरांना जन्म देतात. मासे, विविध प्रकारच्या बुरशी, बेडूक, आळंबीचे विविध प्रकार यांच्या वाढीचे प्रमाण पावसाळ्यात अधिक असते.

भारताच्या विविध प्रांतात पावसाळ्यात वाहणारे धबधबे, पश्चिम घाटातील निसर्गाचा हिरवेपणा याचा अनुभव घेता येतो.

पावसाळ्यात निसर्ग हिरवा आणि जिवंत असतो, तर उन्हाळ्यात तो थोडा कोरडा आणि

निष्क्रिय असतो. पावसाळा हा सर्व इंद्रियांना गुंतवून ठेवणारा ऋतू आहे. पावसाची प्रत्येक गोष्ट अधिक काव्यमय असते आणि प्रगल्भ वाटते. यामुळेच की काय अनेक कवी कवयित्री, गीतकार यांना नवनवीन कल्पना सुचतात. मराठी हिंदी चित्रपट जगताचा नुसता विचार केला तर लक्षात येतं पावसावरची अनेक गाणी आपल्या मनाला आनंद देऊन जातात. पावसावरची ही कविता बघा...

बरंच काही, आपण मागायच्याही आधी

**पाऊस देऊन जातो**
**सांडून जातो धुवांधार आसुसलेलं, थबकलेलं**
**बरंच काही मोकळं मोकळं करून जातो**
**पाऊस सांगत नाही**
**त्याच्या मनातलं यायच्या आधी,**
**पण आपल्या मनातलं सारं काही**
**शहाण्यासारखं समजून घेत**
**हवं तेव्हा, हवा तसा**
**आपल्यासाठीच भरून येतो**
**निवळशंख पाणी एक थेंब, दोन थेंब...**
**आभाळभर रांगच रांग;**
**पुन्हा थेंब, त्यात पाऊस,**
**नितळ नितळ करत जातो, बरंच काही,**
**आपण मागायच्याही आधी पाऊस देऊन जातो.**

**– स्पृहा जोशी**

सहजपणे पाऊस मनाला स्पर्श करून जातो. खरय ना? बघा हं. खिडकीला चिकटलेले पावसाचे थेंब, टिनच्या छपरावरचा पावसाचा आवाज असो किंवा ओल्या गवताची अनुभूती असो. पाऊस, मान्सूनमध्ये एक जादू आहे जी फक्त अनुभवता येते.

पाऊस म्हणजे नूतनीकरण आणि परिवर्तनाचा हंगाम आहे, जिथे आपल्या सभोवतालचे जग ताजेतवाने वाटते.

मान्सून हा चिंतन आणि आत्मपरीक्षणाचाही काळ आहे. मान्सून जीवनासाठी आवश्यक आहे. कारण तो जलस्रोत भरून काढतो, मातीचे पुनरुज्जीवन करतो आणि शेतीला आधार देतो मान्सूनचा हा जीवनदायी पैलू त्याचे महत्त्व अधोरेखित करतो !!

आधुनिक जीवनाच्या सततच्या मागण्यांमधून एक स्वागतार्ह विराम आहे. पावसाचा आवाज ही एक सतत, दिलासा देणारी उपस्थिती आहे. रिमझिम पाऊस असो वा मुसळधार पावसाचा ढोल-ताशांचा आवाज असो, पाऊस आला की मनाला फार शांत वाटते. अधूनमधून ढगांचा गडगडाट म्हणजे निसर्गाचे संगीत, निसर्गाच्या सामर्थ्याची आणि भव्यतेची आठवण करून देते. संवेदी अनुभव, जीवन देणारा पाऊस, आत्मनिरीक्षणाच्या संधी आणि समुदायाची भावना या सर्व गोष्टी मान्सूनच्या विशेषपणाचे रूप आहे.

मानवाच्या सर्व भावनांचे सुंदर रूप म्हणजे पाऊस. तुम्हाला पावसाला प्रियकर मानून आळवणी करणारे गीत आठवते? की पावसामुळे विरहाने व्याकूळ होणा-या मनाचे गीत आठवते? आईची परवानगी घेऊन पावसात भिजायला जावू का विचारणारे बालगीत आठवते? आठवले ना? कारण हा पाऊस, हा वर्षा ऋतू किंवा शास्त्रीय भाषेतला हा मान्सून म्हणजे दगदगीच्या, ताणतणावाच्या गोंधळलेल्या जीवनात चैतन्यमयी वैभवाचा उत्सव आहे. तरीही पावसात आपल्याला काळजीपूर्वक वागायला लागतेच.

**।। सर्वो विधिर्वर्षासू शस्यते ।।**

असे आचार्य चरकांनी सांगून ठेवले आहे. म्हणजेच तिन्ही दोषांचे शमन करणाऱ्या व जठराग्नी प्रदीप्त करणाऱ्या क्रिया वर्षा ऋतूत कराव्या. ग्रीष्म ऋतूमध्ये म्हणजेच उन्हाळ्यामध्ये आपली भूक कमी झालेली असते, जठराग्नी मंद झालेला असतो.

म्हणूनच पावसाळ्यात आपले बल वाढेल, जठराग्नी वाढेल व झालेला वातप्रकोप कमी होईल, असे अन्न आपण खावे. पचायला जड असा आहार या दिवसांत शक्यतो करू नये, आधीच मंद झालेला अग्नी त्यात जड खाल्ल्याने अजून त्रासदायक होऊ शकतो. म्हणून आधी पचण्यास हलके असे अन्न खावे. अन्न हे शक्यतो गरम, ताजे व पूर्ण शिजवलेले

असावे. चव आणि अग्नी प्रदीप्त करण्यासाठी आंबट, तिखट आणि थोडेसे क्षारीय पदार्थ जसे की लोणचे, पापड इत्यादीचा समावेश असावा.ज्वारीच्या लाह्या, साळीच्या लाह्या, भाकरी, मुगाचे वरण अथवा विविध भाज्यांचे सूप यांचा समावेश असावा. आहारात जुनी धान्ये (गहू, हातसडीचा तांदूळ) वापरावी व नवीन धान्ये वापरायची असल्यास ती भाजून वापरावी. श्रुतशीत जल म्हणजेच उकळून गार केलेले पाणी प्यावे, याने रोग पसरण्याची शक्यता कमी होते. भेंडी, फ्लॉवर, कोबी, पडवळ, दोडका, कारले अशा सर्व प्रकारच्या फळभाज्या खाव्यात, पालेभाज्या खाऊ नयेत. गाजर, मुळा, कांदा, टोमॅटो प्रमाणात खावे, काकडी खाऊ नये.

आलं, तुळस, पुदिना, गवती चहाने युक्त आणि भरपूर उकळलेला चहा घ्यावा. स्निग्ध पदार्थांचा जेवणात समावेश करावा. दूध, दही हे कफ वाढवणारे असल्याने खाऊ नये, ताक हे मंद झालेल्या जठराग्नीला दीपन करण्याचे कार्य करते. त्यामुळे गोड, ताजे ताक काळे मीठ टाकून प्यावे. लसूण हा स्निग्ध, उष्ण आणि उत्तम वातनाशक आहे. त्यामुळे त्याचे सेवन करावे. हिंग, सुंठ, मिरे, जिरे, आले, लिंबू, पुदिना यांचा समावेश अवश्य असावा. स्निग्ध पदार्थ जरी खायचे असले तरी तेलकट भजी, वडे असे बाहेरील पदार्थ मात्र खाऊ नयेत. त्याने साथीचे रोग पसरण्याची शक्यता असते.

थोड्या प्रमाणात सर्दी, खोकला असल्यास घरी वाफ घेणे, हळद, मीठ व कोमट पाण्याच्या गुळण्या करणे तसेच गूळ-हळद, दूध-हळद यांचे सेवन करावे. उघड्यावरील अन्नपदार्थ सेवन करणे शक्यतो टाळावे, जेणेकरून साथीचे आजार पसरण्याचे प्रमाण कमी होईल.

जर जास्त प्रमाणात सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, पोटदुखी, घसा दुखणे अशी लक्षणे जाणवल्यास आपल्या जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. निर्जंतुकीकरण करण्याच्या उद्देशाने घरात गुग्गुळ, चंदन, ओवा या सर्वांचा धूप करावा. तळपाय शक्यतो कोरडे ठेवावे जेणेकरून पायांच्या बोटांमध्ये इन्फेक्शन होणार नाही. बाहेर पडताना शक्यतो पाय घसरणार नाही आणि कोरडे राहतील अशा पद्धतीचे चप्पल अथवा शूज वापरावे.

एकूणच वर्षा ऋतूचा आनंद घ्यावयाचा तर काळजी घ्यावीच लागणार. पाऊस अनेकदा आपल्याला घरामध्येच राहण्यासाठी भाग पाडतो, ज्यामुळे रोजच्या कामाचा वेग कमी करण्याची आणि विचार करण्याची संधी मिळते. चिंतन, मनन, लेखन, नवनिर्माणाचे अनेक पैलू पावसामुळे माणसाला घडवतात असही म्हणू शकतो आपण!! हे सारं वाचत असताना आताही पाऊस पडत असेल !


हातात चहाचा कप अन् कानावर पावसाची गाणी, धून वाजत असेल तर याहून स्वर्ग सुख काय बरं वेगळं असेल?!!!

**रिम-झिम गिरे सावन, सुलग सुलग जाए मन**
**भीगे आज इस मौसम में, लगी कैसी ये अगन**
**रिम-झिम गिरे सावन, सुलग सुलग जाए मन**
**भीगे आज इस मौसम में, लगी कैसी ये अगन**

**- वैदेही जोशी,**
मोबा. ९५४५६३५४६५

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

# चंद्रकांत गोखले – देवमाणूस !



असा देवमाणूस खरोखरच अस्तित्वात होता, कोणाचा विश्वास बसणार नाही. सच्चा 'रणभुमीमागील योद्धा' असे सामाजिक कार्य जमणार आहे का ??

चंद्रकांत गोखले यांनी कोणताही गाजावाजा न करता प्रतिवर्षी एक लाख रुपये कारगिल शहिद सैनिकांच्या कुटुंबियांसाठी दिली. आज हा आकडा कमी वाटत असला तरी चार दशकापूर्वी तो एक कोटीप्रमाणे होता. सैनिकांसाठी खर्च करता यावा यासाठी ते केवळ एकच वेळ जेवण करत, कुणाचीही एक पै ची पण मदत घेत नसत, स्वतःला मिळणाऱ्या पेन्शनमधून ते हे आभाळाएवढे समाजकार्य करत होते. का? तर भारतमातेसाठी शाहिद झाल्याच्या घरात कुणी उपाशी राहू नये. रेशनिंगच्या रांगेत शेवटपर्यंत उभा राहणारा, मराठी दिग्ज अभिनेता !

मराठी रंगभूमी आणि चित्रपटात आघाडीचा नायक नेहमी बसने व पायी प्रवास करत. आपल्या विक्रमला, 'तू मला भेटायला २००० रु. चे पेट्रोल जाळून मुंबईहून पुण्याला येऊ नकोस.' असे निक्षून सांगणारे चंद्रकांत गोखले. कितीही अडचणी आल्या तरी कारगिल शहिद सैनिकांच्या कुटुंबियांसाठी प्रतिवर्षी एक लाख रुपये त्यांनी मदत थांबवली नाही.

अशी माणसं खरोखरच दुर्मिळ..

०२.०९.१९९९ ची गोष्ट... मी सकाळी सकाळीच कुठल्याशा नाटकाच्या जाहिरातीचं अर्जंट काम करत घरी बसलो होतो. तेवढ्यात खालून खणखणीत आवाजात हाक ऐकू आली... कुमार, आहेस का घरात? दोनतीन मिनिटांत जिन्याच्या पायऱ्या चढून शेजारच्या बिल्डिंगमधे राहणारे चंद्रकांत गोखले (बाबा) हजर झाले. मला घाईघाईत म्हणाले, 'कुमार, एक तातडीचं, महत्त्वाचं काम होतं..! मला कारगिल जवानांच्या मदतीसाठी १,००,००० रु. पाठवयचेत. पण १६,००० रु. कमी पडताहेत. मला मिळतील का उसने?'

मी म्हणालो, 'बाबा, आत्ता माझ्याकडं एवढे पैसे नाहीत. पण संध्याकाळपर्यंत बँकेतून काढून दिले तर चालेल का?' तर 'चालेल, मी येतो संध्याकाळी' म्हणाले आणि आनंदात घरी गेले.

मी संध्याकाळी बँकेतून आणून १६,००० रु. तयार ठेवले. संध्याकाळी ४-४.३० च्या सुमारास बाबा पुन्हा माझ्या घरी आले आणि म्हणाले, 'मला येणे होते ते ३५०० रु. आत्ताच एकाकडून मिळाले, तर आता तू मला फक्त १२,५०० रुपयेच दे.'

मग कापडी पिशवीतून एक पिवळा पडलेला, नीट घडी घातलेला कागद माझ्या हातात देत म्हणाले, 'हा कागद असू दे तुझ्याकडं.'

मी कुतूहलानं कागद पाहिला, तर त्यांच्या मातोश्री कमलाबाई यांच्या नावे असलेल्या ट्रस्टच्या जुन्या लेटरहेडवर (सकाळी हवी असलेली) १६,००० ची रक्कम माझ्याकडून उसनी घेत असल्याचं आणि ती डिसेंबर ९९ च्या आत परत करणार असल्याचं त्यांनी 'लिहून' दिलं होतं. एवढंच नव्हे, तर 'मी जिवंत नसलो, तर माझा मुलगा विक्रम आपले पैसे परत देईल' असंही लिहिलं होतं..!!!

त्यांच्या कल्पनेप्रमाणे दोन 'रेव्हेन्यू स्टँप्स' लावून त्यावर सही करून तो 'कागद' (त्यांच्या परीनं) त्यांनी 'प्रमाणित'ही केला होता..!

मी म्हणालो, 'बाबा काय गरज आहे ह्या कागदाची? जमतील तेव्हा द्या पैसे परत. पण मी हा कागद ठेवून घेणार नाही!' तर डोळ्यांत पाणी आणून आर्जवपूर्वक तो ठेवून घ्यायला त्यांनी मला भाग

पाडलं.

तीनचारच दिवस होतात, न होतात, एवढ्यात बाबा पुन्हा माझ्याकडे आले आणि (डिसेंबरचा ‘वायदा’ असताना) पिशवीतून पैशांचा गठ्ठा काढून मला देत म्हणाले, ‘अरे, योगायोग बघ कसा आहे..! कालच मला एका चित्रपटाचं काम आलं आहे, आणि त्यांनी ॲडव्हान्सही दिलाय. आता ती चिठ्ठी आण, आणि माझ्यासमोर फाडून टाक..!’

मी म्हटलं, ‘मुळीच फाडून टाकणार नाही..! माझा ठेवा आहे तो..!’

मी त्याच कागदावर तारीख टाकून आभारपूर्वक पैसे परत मिळाल्याचे लिहिले आणि (मी ‘नको’ म्हणत असताना बाबांनी आवर्जून लिहून आणलेला) तो ‘कागद’ जपून ठेवला..!

ह्या आमच्या ‘व्यवहाराची’ माहिती कदाचित विक्रम गोखल्यांनाही नसावी. (मीही सांगितली नाही अजून.. पण आता कधीतरी आवर्जून सांगायलाच हवी..!)

एक वेळ उपाशी राहून प्रतिवर्षी सैनिकांना एक लाख रुपये देणारा अभिनेता चंद्रकांत गोखले. जन्म – ७ जानेवारी १९२१, मृत्यू– २० जुन २००८. परिवार – अभिनेते विक्रम गोखलेंचे वडील

अभिनय प्रवास – वयाच्या नवव्या वर्षी रंगभूमीवर पदार्पण. सात दशकात ६० पेक्षा जास्त नाटक व त्याहीपेक्षा जास्त चित्रपटात काम.

चंद्रकांत गोखले यांनी कोणताही गाजावाजा न करता प्रतिवर्षी एक लाख रुपये शहिद सैनिकांच्या कुटुंबियांसाठी दिली. या देशप्रेमी कलावंतास भावपूर्ण आदरांजली !

‘सच्चा रणभुमीमागील योद्धा’ असे जाज्वल्य सामाजिक कार्य करायचे म्हटले तर आज कुणाला जमणार आहे का?

**– संतोष द. पाटील**

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

**शनिवार, दि. 28 पुष्य नक्षत्र**


**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर, 0231–2546585**

**दिनविशेष (जून २०२५) विश्वावसूनाम संवत्सरे**
**ज्येष्ठ - आषाढ १९४७**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**रविवार दि. १ :** जागतिक पालक दिन, **गुरुवार दि. ५ :** जागतिक पर्यावरण दिन, **शुक्रवार दि. ६ :** शिवराज्याभिषेक सोहळा, रायगड, **शनिवार दि. ७ :** बकरी ईद, **सोमवार दि. ९ :** शिवराज्याभिषेक दिन (शिवशक ३५२ प्रारंभ), **मंगळवार दि. १० :** वटपौर्णिमा, **बुधवार दि. ११ :** साने गुरुजी स्मृतीदिन, **गुरुवार दि. १२ :** कर्नाटकी बेंदूर, **शनिवार दि. १४ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. १०.०२), जागतिक रक्तदाता दिन, **रविवार दि. १५ :** फादर्स डे, **मंगळवार दि. १७ :** राजमाता जिजाऊ स्मृतिदिन, **बुधवार दि. १२ :** राणी लक्ष्मीबाई पुण्यदिन, **शनिवार दि. २१ :** जागतिक योग दिन, **रविवार दि. २२ :** संत निवृत्तीनाथ पुण्यदिन, **गुरुवार दि. २६ :** छ. शाहू महाराज जयंती, श्री टेंब्येस्वामी पुण्यतिथी.

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ७ : ज्ञानयोग**

श्री भगवानुवाच ।

**तयामध्ये नीतियुक्त करुनी । एक भक्त श्रेष्ठ ज्ञानी ।। यासी मी आवडे म्हणोनी । ज्ञानी तो मज प्रिय ।।**

ज्ञानी वरिष्ठ सर्वांत नित्य-युक्त अनन्य जो
अत्यंत गोड मी त्यास तो हि गोड तसा मज।।१७।।

**सर्वस्वे जे उदार असती । त्या माजी ज्ञानी ते आत्मा होती । मी तया होय उत्तम गति । म्हणोनी आश्रय असती माझे देख ।।**

उदार हे जरी सारे ज्ञानी तो मी चि कीं स्वयें ।
जोडला स्थिर माझ्यांत गति अंतिम पाहुनी ।।१८।।

**बहूत जन्म कष्टोनी । ज्ञान पावलिया माझे कृपे करूनी । हे सर्व वासुदेव जाणोनी । जे महात्मा दुर्लभ ।।**

अनेक जन्म घेऊनि पावला शरणागति
विश्व देखे वासुदेव संत तो बहु दुर्लभ ।।१९।।

**अभ्यासें करून अज्ञान हरिलें । अन्य देवतातें भजो लागले । ते तेणें मज अंगिकारिले ते जाले । आपले कृपे करूनिया ।।**

भ्रमले कामना-मस्त धुंडिती अन्य दैवतें
स्वभाव-वश होऊनि तो तो नियम पाळिती ।।२०।।

**श्रद्धे करूनि आन देवती भजती । तयाचि आराधना करिती । तयाची कामना तृप्ती । ते मीचि करी ।।**

श्रद्धेनें ज्या स्वरुपास जे भजूं इच्छिती जसे
त्यांची ती चि तशी श्रद्धा स्थिर मी करतिं स्वयें ।।२१।।

**श्रद्धे करूनि आन देवती भजती । तयाचि आराधना करिती । ते इष्ट काम पावती  तया अचळ श्रद्धा मीचि देता होय ।।**

त्या श्रद्धेच्या बळाने ते त्या स्वरूपास पूजिती
मग मागितले भोग पावती मीं चि निर्मिले ।।२२।।

**जे हीन बुद्धि मागती । ते नाशिवंत फळ तात्काळ पावती । जया जे भजन तया तेचि गति । मज भजती ते पावती माते ।।**

अल्प बुद्धिमुळें त्यांस मिळे फळ अशाश्वत
देवांचे भक्त देवांस माझे ते मज पावती ।।२३।।

**माझे निजस्वरुप नेणती । अव्यक्त व्यक्ती आले म्हणती । माझा उत्कर्ष भाव नेणती । मूढपणे लोक।।**

व्यक्ती मी हें चि ते घेती बुद्धि-हीन न जाणुनी
अव्यक्त थोर जे रूप माझें अतिम शाश्वत ।।२४।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

**शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा**

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक बेचाळिसावा)

१५

त्या नीरव शांततेचा भंग केला आचार्यांनी. एकमेकांचे हात धरून पुढे येऊन उभ्या असलेल्या चौघांकडे बघून त्यांनी विचारलं, ''बाळांनो, तुम्ही कोण आहात? आणि इथं कशासाठी आला आहात? ही धर्मसभा आहे. इथं सगळे धर्ममार्तंड आणि विद्वत्जन येतात. इथं लहान मुलांचं काय काम? तुम्हाला काही हवं आहे काय?'' आचार्यांनी प्रेमळपणे विचारलं आणि चौघांच्या तोंडून एकदमच शब्द बाहेर पडले. ''होय आचार्यदेव, आम्हाला न्याय हवा आहे !''

''काय? तुम्हाला न्याय हवा आहे? अरे तुम्ही तर निरागस लहान मुलं आहात. तुमच्यावर कोणी अन्याय केलाय? सांगा ! नि:संकोचपणे सांगा.'' बोपदेवांनी जणू अभय दिलं. तशी निवृत्तीदादा पुढे झाला. मस्तक झुकवून आचार्यांना प्रणाम करून तो म्हणाला, ''आचार्यदेव, आमच्यावर या धर्मसभेनंच अन्याय केला आहे. त्याबद्दलचं वृत्त सविस्तर सांगण्याची अनुमती मिळावी.'' त्याच्या बोलण्याचं, नम्रतेचं, स्वरातील मार्दवाचं आचार्यांना कौतुक वाटले. ते म्हणाले, ''सांग बाळ ! तुला अनुमती आहे; पण त्या आधी तुम्ही स्वत:ची ओळख सांगा.'' निवृत्तीनं मान झुकवली. दोन पावलं पुढे येऊन हात जोडून तो म्हणाला, ''आचार्यदेव, मी विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई कुलकर्णी यांचा ज्येष्ठ पुत्र आणि गहिनीनाथांचा शिष्य निवृत्तीनाथ !'' त्याचं सांगून झालं आणि ज्ञानेश्वर पुढे झाला, ''आचार्यदेव, मी विठ्ठलपंत-रुक्मिणीबाईंचा द्वितीय पुत्र आणि निवृत्तीनाथांचा शिष्य ज्ञानेश्वर.'' नतमस्तक होऊन हात जोडून ज्ञानेश्वरांनी आपली ओळख सांगितली. आता वेळ सोपानाची होती. तो पुढे झाला.

त्याचं वय असेल जेमतेम सात-आठ वर्षांचं, चंद्रासारखा शीतल चेहरा, डोळ्यांतले निरागस भाव, धर्मसभेत आल्यामुळे की काय; किंचित कावरीबावरी झालेली नजर, महिरपीसारखा पातळ ओठ-ओठांची रचना अशी, की जणू या ओठांतून सतत हसू ओघळतंय आणि त्यामुळेच की काय, सोपानाची मुद्रा प्रसन्न दिसायची. आश्वासक दिसायची. हात जोडून मस्तक झुकवून त्यानं नमस्कार केला आणि म्हणाला, ''आचार्यदेव, मी विठ्ठलपंत आणि रुक्मिणीआईचा कनिष्ठ पुत्र आणि निवृत्तीनाथांचा शिष्य सोपान. सोपानदेव !'' असे सांगून त्यानं क्षणभर नेत्र उचलून बोपदेवांकडे पाहिलं. बोपदेवांच्या नजरेला त्याची नजर मिळाली. क्षणभरच! त्या नजरानजरेत एक द्वंद्व उमटलं. निरागसतेचं कटुतेशी, भक्तीचं धर्मशास्त्राशी, श्रद्धेचं कर्मकांडाशी, विश्वासाचं कट्टरतेशी आणि अपेक्षेचं हेटाळणीशी. बोपदेवांची अनुभवी नजर सोपानाच्या नजरेत रुतली होती आणि ठाव घेत होती त्याचा. त्या नजरेतला आत्मविश्वास, सच्चेपणा, निरागसता आणि हृदयाचा ठाव घेणारं ते लाघवी आर्जव बघून बोपदेवांनाही गलबून आलं. आपल्या हृदयाचा तळ कुणीतरी ढवळून काढतंय, असं त्यांना वाटायला लागलं. या सात-आठ वर्षांच्या पोराच्या, सोपानाच्या नजरेला आपण फार काळ नजर देऊ शकणार नाही, असं त्यांना वाटून गेलं. त्याच्या नजरेतली अपेक्षा आपण पूर्ण करू शकणार नाहीच, पण त्याच्या नजरेतल्या प्रश्नांना आपल्याजवळ उत्तरं नाहीत याची त्यांना जाणीव झाली. अपराधीपणाच्या भावनेनं त्यांनी नजर झुकवली.

तोच अचानक त्यांची सुटका झाली. मुक्ता पुढे आली. जमिनीवर डोकं टेकवून लहान मुली करतात तसा तिनं नमस्कार केला. हात जोडून उभी राहिली.

म्हणाली, ''आचार्य, मी विठ्ठलपंत-रुक्मिणी या माय-तातांची कन्या. मुक्ता माझं नाव !'' तिचे वय असेल सहा-सात वर्षांचं. तो निरागस चेहरा, ते निष्पाप भाव, ती निर्व्याज मुद्रा ! आता मात्र बोपदेवांना राहवेना, ''अरे ! अरे बाळांनो, तुम्ही एवढी लहान आहात आणि तुमच्यावर कुणी रे अन्याय केला? शास्त्रीपंडितांनी? की धर्ममार्तंडांनी?'' बोपदेवांनी तीव्र स्वरात पृच्छा केली.

मग मात्र निवृत्ती पुढे झाला आणि म्हणाला, ''आचार्यदेव, अनुमती असावी. मी साद्यंत हकिकत सांगतो. माझे तात विठ्ठलपंत कुलकर्णी यांनी पत्नीची मूक संमती गृहीत धरून संन्यास घेतला. त्यानंतर पुन्हा महद्‌गुरुस्वामी श्रीधरपंत यांच्या आज्ञेनं ते गृहस्थाश्रमी बनले. त्यानंतर आम्हा चार भावंडांचा जन्म झाला. त्यामुळे समाजानं त्यांना बहिष्कृत केलं व त्यांच्यावर ग्रामण्य घातलं. माझ्या तातांनी तीन कृच्छे, तीन चांद्रायणे, जातकर्मादि विधी केले. गुरुंच्या आज्ञेनुसार प्रायश्चित्तही घेतलं; पण समाजाचा बहिष्कार उठला नाही. समाजाकडून अवहेलना, अत्याचार, अपमान, तिरस्कार सोसतच आम्ही मोठे झालो. मौजीबंधनाचं माझं वय झालं, तेव्हा तात या धर्मपीठात आले. धर्ममार्तंडांना भेटले. त्यांना माझ्या उपनयन संस्काराची अनुमती देण्याची हात-पाय जोडून विनंती केली. त्यांनी धर्मशासत्राचा धांडोळा काढून त्यासाठी त्यांच्याकडून घडलेल्या धर्मबाह्य वर्तनासाठी देहान्त प्रायश्चित्ताही शिक्षा सुनावली.'' बोलता-बोलता निवृत्तीचा आवाज कापरा झाला. त्याच्या खांद्यावर हात ठेवून ज्ञानेश्वर पुढं बोलू लागला -

''धर्मसभेच्या आदेशानुसार माझ्या माय-तातांनी, माझ्या आई-बाबांनी देहान्त प्रायश्चित्त घेतलं. त्यांनी आपले देह प्रयाग क्षेत्री गंगेला अर्पण केले. त्या वेळी हा निवृत्तीदादा दहा वर्षांचा, मी ज्ञानेश्वर आठ वर्षांचा, हा सोपान सहा वर्षांचा आणि... आणि ही चिमुरडी मुक्ता केवळ... केवळ...'' ज्ञानेशाला पुढे बोलवेना. त्याचा कंठ दाटून आला. डोळ्यांत पाणी भरलं. त्याच्या खांद्यावर थोपटत सोपान पुढे झाला -

''आणि मुक्ता केवळ चार वर्षांची होती आचार्यदेव ! आम्हा चार भावंडांना पोरकं करून, अनाथ करून आमचे आई-बाबा देहान्त प्रायश्चित्त घेऊन निघून गेले. त्यांनी धर्मबाह्य वर्तन केलं होतं, हे खरं मानलं, तरी नंतर त्यांनी धर्माचा, धर्मशास्त्राचा, धर्मसभेचा मान ठेवून दिलेली शिक्षा मुकाट भोगली. ती शिक्षा भोगत असताना आम्हा लहान लेकरांसाठी त्यांचं काळीज तुटलं नाही असं नाही; पण आपल्या लेकरांना समाजानं सामावून घ्यावं, म्हणूनच आमचे आई-बाबा आम्हाला सोडून गेले आणि आम्ही चौघं जण पोरके... अगदी पोरके झालो...!'' सोपानाला पुढे बोलवेना. त्याच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहायला लागले; पण तोवर निवृत्तीदादा सावरला होता. ''आचार्यदेव, धर्मसभेची आज्ञा शिरसांवद्य मानून आमच्या आई-बाबांनी देहान्त प्रायश्चित्त घेतलं खरं ! पण त्यानंतरही धर्मसभेनं आमच्यावरचा बहिष्कार, आमच्यावरचं ग्रामण्य उठवलं नाही.'' निवृत्तीदादा पुन्हा भावूक झाला. ज्ञानेशानं ओघळणारे अश्रू मघाच पुसले होते. त्यानं पुढे बोलायला सुरुवात केली. ''आई-बाबांविना पोरकी, अनाथ झालेली आम्ही भावंडं समाजाकडून अन्याय, अवहेलना, तिरस्कार झेलत जगत आहोत. माधुकरी मागून दोन घास खातो आहोत. ती माधुकरीसुद्धा इतरेजनांकडूनच मिळते आहे. आमच्या वडिलांनी दिलेलं शिक्षण, आईनं केलेले संस्कार, हीच आमची शिदोरी आहे. तिच्यावरच... आम्ही... आम्ही दिवस... कंठतो... आहोत.'' ज्ञानेशा पुन्हा गहिवरला; पण आता सोपान सावरला होता. ''आचार्यदेव, आमच्या आई-बाबांनी जे धर्मबाह्य वर्तन केलं, त्याचं त्यांनी प्रायश्चित्त घेतलं. प्रायश्चित्तानं पापं धुतली जातात ना? त्यांनी देहान्त प्रायश्चित्त घेतलं. मृत्यूनंतर वैर संपतं, असं म्हणतात ना? मग देव, आई-बाबांच्या प्रायश्चित्तानं त्यांचं पाप धुतलं गेलं नाही? आणि हे जर बरोबर असेल, तर आई-बाबांच्या देहान्त प्रायश्चित्ताला काही अर्थच राहणार नाही आणि त्यांच्या मृत्यूला जर देहान्त प्रायश्चित्ताचा अर्थ नसेल, तर त्यांचा मृत्यू म्हणजे हत्या ठरेल, असं

नाही का वाटत आपल्याला !'' ज्ञानेशानं पाहिलं. सोपान अत्यंत संयमानं, मार्दवानं, नम्रतेनं बोलत होता; पण त्याच्या भालावरती शीर तणाणली होती. चेहरा लाल झाला होता. हाताची बोटं मिटली गेली होती. ज्ञानेशानं सोपानाला हाताला धरून जवळ घेतलं. मुक्ताच्या हातात त्याचा हात दिला आणि तिला नजरेनं खुणावून आपण बोलायला सुरुवात केली. ''क्षमा आचार्यदेव ! तो अजून लहान आहे. त्याचं बाल्य संपलेलं नाही; पण तरीही प्रायश्चित्तानं पापातून मुक्ती मिळते हे जर सत्य असेल, तर आम्हाला चौघांना बहिष्कारातून मोकळं केलं पाहिजे. आमच्यावरचं ग्रामण्य काढून आम्हाला समाजात सामावून घेतलं पाहिजे, हे तरी संयुक्तिक आहे ना? मृत्यूनं साऱ्या पापांपासून मुक्ती मिळते आणि वैरत्व संपतं, हे तरी योग्य आहे ना? मग आचार्यदेव, आमच्यावरचं ग्रामण्य का संपलं नाही?'' ज्ञानेश्वर क्षणभर बोलायचा थांबला. मग मात्र निवृत्तीदादा पुढे झाला आणि हात जोडून म्हणाला, ''आचार्यदेव, आम्हा चौघांची आपल्याला, या धर्मसभेला, या धर्ममार्तंडांना अशी हात जोडून विनंती आहे की, आमच्यावरचं ग्रामण्य उठवावं. आम्हाला समाजात सामावून घ्यावं आणि आम्हा तिघांच्या उपनयन संस्काराला अनुमती द्यावी. आपण हे केलंत, तर आम्ही आपले शतश: ऋणी राहू.'' निवृत्तीदादानं बोलणं संपवलं आणि चौघंही जण नतमस्तक होऊन हात जोडून उभी राहिली. त्या चौघांचे चेहरे आता मात्र अगदी केविलवाणे दिसत होते. त्यांचे चेहरे बघून बोपदेवांच्या काळजात तुटलं. त्यांनी शंकरशास्त्री सोमणांना तिथल्या तिथे आदेश दिला, ''शास्त्रीबुवा, सगळ्या पोथ्या चाळा, सगळी धर्मशास्त्रे धुंडाळा, सगळे शास्त्रार्थ पाहा आणि या मुलांना परत समाजात सामावून घेण्यासाठी शास्त्राधार पहा. आम्हीही पैठणला जाऊन शास्त्रं-पुराणं शोधतो. बाळांनो, तुम्ही निश्चिंत राहा. काहीतरी शास्त्राधार सापडेल. त्या बरहुकूम धर्मसभा तो अमलात आणेल. तुम्ही दोन दिवसांनी या आणि शास्त्रीबुवांना भेटा.'' एवढं बोलून बोपदेवांनी साऱ्या धर्मसभेला आज्ञा केली. ''दोन दिवसांनी ही मुलं धर्मसभेत येतील, तेव्हा आज झाला त्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये. याची धर्ममार्तंडांनी दक्षता घ्यावी !'' आचार्य बोपदेव उठून उभे राहिले. त्यांनी दोन्ही हात वर उचलले. धर्मसभा संपल्याची ती खूण होती. सर्वांनी आचार्यांना वंदन केलं. आचार्य धर्मागाराच्या बाहेर पडले. त्यांच्याबरोबर छत्रचामधारी सेवकही होता. त्यांच्यापाठेपाठ पंडित मोरेश्वरशास्त्री बाहेर पडले. नंतर मात्र शंकरशास्त्री सोमणांनी विनायकबुवांना सांगितले, ''विनायकबुवा, मुलांना घेऊन तुम्ही आधी बाहेर पडा. उगीच ब्राह्मक्षोभ व्हायला नको.'' विनायकबुवांनी सोपान-मुक्ताचा हात धरला आणि निवृत्ती-ज्ञानेशाला पुढे घालून ते झपाट्याने धर्मगाराबाहेर पडले. मागे राहिलेल्या शास्त्री-पंडितांच्यात मात्र झाल्या प्रकाराबद्दल जोरदार चर्चा सुरू झाली. अजून कशात काही नसताना ही चार भावंडं आज चर्चेच्या केंद्रस्थानी होती. भविष्याची ही झलकच होती हे खरं !


आणि या सर्वांपासून अनभिज्ञ असलेली ते चौघे मात्र आपल्या त्याच निरागसपणानं आणि त्याच निष्पाप मनानं झोपडीकडे परतली; पण चौघांच्या चेहऱ्यावर समाधान होतं. निदान मनात खदखदणाऱ्या प्रश्नांना वाचा तरी फुटली होती. मनात उद्भवणाऱ्या वादळाचा निचरा तरी झाला होता. आता निर्णय काही लागो. अर्थात त्या निर्णयावर या चौघांचं काही फारसं अवलंबून होतं असं नाही; पण निदान आपल्यावर होत असलेला अन्याय चारचौघांसमोर मांडता आला होता. मनाचा होणारा कोंडमारा, जिवाची होणारी घुसमट, विचारांची छळणारी आवर्तनं, भविष्याविषयीच्या कुशंका, चक्रावून टाकणारी वर्तमानातली वादळं आणि याला कारणीभूत असलेली भूतकाळातली अंधारभूतं. मनात खदखदणाऱ्या प्रश्नांचा उच्चार झाल्यामुळे निदान या सर्वांपासून तरी मुक्तता मिळणार होती आणि याच समाधानात चौघेही घरी परतली. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००


# मुलांचे पान



## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# ब्राह्मण आणि सरकारी अनुदान

**भाग ५**

या भागात आपण माहिती तंत्रज्ञान, संगणक, टूल रूम यांच्या प्रशिक्षणाबद्दल अमृतच्या काय योजना आहेत याचा मागोवा घेऊ या. तसेच नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्याकरता उपरोक्त संस्था काय उपक्रम राबवते हेही बघू या.

**१) C-DAC संस्थेमार्फत माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण योजना – योजनेचा उद्देश :–** महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील अमृतच्या लक्षित गटातील जातीच्या, आर्थिक दुर्बल घटकातील उमेदवारांना माहिती तंत्रज्ञान, उच्च कार्यक्षमता संगणक, ग्रिड आणि क्लाउड संगणक, बहुभाषिक संगणक, व्यावसायिक इलेक्ट्रॉनिक्स, सॉफ्टवेअर तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, सर्वव्यापी संगणक प्रशिक्षणाद्वारे उद्योगाभिमुख रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती करणारे प्रशिक्षण देणे.

C-DAC म्हणजे सेन्टर फॉर डेव्हलपमेंट अँड अडवान्सड कॉम्पुटिंग ही सरकारी संस्था असून नामवंत आहे. जेव्हा १९८० मध्ये अमेरिकेने आपल्याला सुपर कॉम्पुटर द्यायला नकार दिला तेव्हा या संस्थेने आपल्या स्वदेशी तंत्रज्ञानाने असा संगणक विकसित केला. या संस्थेची भारतभर दहा केंद्रे आहेत आणि मुख्य केंद्र पुणे येथे आहे. यांचे ग्रॅज्युएशननंतर ६ महिन्याचे कोर्स असतात आणि हे यशस्वीरित्या करणाऱ्यांना चांगली नोकरी मिळण्याची शाश्वती असते .

**लाभार्थी लक्ष गट :**

राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही शासकीय / संस्था / महामंडळामार्फत अशा योजनांचा लाभ मिळत नाही अशा अमृतच्या लक्षित गटातील जातीचे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक, युवती जे सदर प्रशिक्षणासाठी इच्छुक असून निश्चित केलेली अर्हता धारण करतात.

**लाभार्थी पात्रता निकष :**

१. अर्जदाराने अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.
२. अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षे मर्यादेत असणे आवश्यक.
३. अर्जदार सी–डॅकची C-CAT ही पूर्व चाचणी परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.
४. अर्जदाराच्या आधार संलग्न बँक खात्याचा तपशील (बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, IFSC कोड) व रद्द केलेला चेक जोडणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक अर्हतेचा निकष :**

**अ) पदव्युत्तर स्तर पदविका प्रशिक्षणासाठी शैक्षणिक अर्हता :**

१. Graduate in Engineering or Technology (10+2+4 or 10+3+3 years) in IT/Computer Science/Electronics/ Telecommunications /Electrical/ Instrumentation/Other equivalent degree

**OR**

२. MSc/MS (10+2+3+2 years) in Computer Science, IT, Electronics/ Other equivalent degree

**OR**

३. As per the Eligibility Criteria shared by C-DAC time-to-time

**ब) सर्टिफिकेट कोर्स प्रशिक्षणासाठी शैक्षणिक अर्हता :** Candidate with any Engineering and Science graduation, with mathematics up to 10+2

(टीप: प्रशिक्षण अभ्यासक्रमानुसार आवश्यक

शैक्षणिक आर्हता, कोर्स कंटेंट, कालावधी इत्यादी बाबत सविस्तर तपशील C-DAC च्या www.cdac.in संकेतस्थळावर उपलब्ध असेल.)

**लाभासाठी अर्ज करण्याची पध्दत :**

१. अमृत व C-DAC यांचे संयुक्त विद्यमाने लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी अमृतच्या www.mahaamrut.org व C-DAC च्या www.cdac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतील.

२. अर्जदारास त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व पदव्युत्तर पदविका अथवा सर्टिफिकेट कोर्स साठी सी-डॅकची C-CAT पूर्वचाचणी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याच्या आवडीनुसार व गुणवत्तेनुसार अभ्यासक्रम निवडण्याची मुभा असेल.

३. C-CAT या पूर्वचाचणी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी आवश्यक शुल्क व कोर्सचे सुरक्षा ठेव शुल्क उमेदवाराने स्वत: भरावे.

४. पात्रतेचे सर्वसाधारण निकष, शैक्षणिक निकष व पूर्वचाचणी परीक्षा निकषामध्ये पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

५. C-DAC मार्फत C-CAT पूर्वचाचणी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व अमृतच्या लाभार्थी पात्रतेचे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी अमृतच्या प्रायोजकत्वासाठी अर्ज करावा.

६. योजनेच्या जाहिरात प्रसिध्दी नंतर पात्रतेच्या सर्व निकषामध्ये पात्र ठरणारे उमेदवार प्रथम येणाऱ्यांस प्रथम प्राधान्य या तत्वावर उपलब्ध आर्थिक मर्यादेत लाभासाठी निवड केली जाईल.

पदव्युत्तर पदविका कोर्ससाठी उपलब्ध कोर्सपैकी खालील ६ कोर्सेसची अमृत योजनेच्या लाभासाठी निवड केलेली आहे. सदर कोर्स ६ महिने (९०० तास) कालावधीचे राहतील.

१. PG-DAC Post Graduate Diploma in Advance Computing

२. PG-DMC Post Graduate Diploma in Mobile Computing

३. PG-DESD Post Graduate Diploma in Embedded System Design

४. PG-DAI Post Graduate Diploma in Artificial Intelligence

५. PG-DBDA Post Graduate Diploma in Big Data Analytics

६. PG-DITISS Post Graduate Diploma in IT infrastructure, Systems Security

**सर्टिफिकेट कोर्ससाठी उपलब्ध कोर्सपैकी खालील ५ कोर्सेसची अमृत योजनेच्या लाभासाठी निवड केलेली आहे.**

१. CCNS Certificate Course in Network Security

२. CCST Certificate Course in Software Testing

३. CCNA Cetificate Course in Network Administration

४. CCJP Certificate Course in Java Programming

५. CCAWT Certificate Course in Advance Web Technology

कोर्सची व प्रशिक्षण केंद्राची निवड उमेदवाराच्या मागणीनुसार व C-CAT पूर्व चाचणी परीक्षा मधील गुणवत्ता यादीनुसार C-DAC संस्थेमार्फत केली जाईल. यासाठी C-DAC संस्थेच्या अटी व शर्तीचे पालन करून कोर्स पूर्ण करणे व उत्तीर्ण होणे उमेदवारास बंधनकारक राहील.

राज्यातील अमृत संस्थेच्या लक्षित गटातील लाभार्थी निवडीचे सर्वसाधारण निकष व शैक्षणिक अर्हतेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या निवडीप्रमाणे वरीलपैकी त्यांनी निवड केलेल्या कोर्ससाठी प्रशिक्षण अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील, जे C-DAC संस्थेस अदा केले जाईल.

**लाभार्थी निवड प्रक्रिया:**

या प्रशिक्षण योजनांतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांना कोणताही प्रत्यक्ष / थेट आर्थिक लाभ अनुज्ञेय नसून केवळ प्रशिक्षण शुल्क स्वरुपात अर्थसहाय्य अंतर्भूत आहे. या योजनेसाठी C-DAC संस्थेच्या अमृत संस्थेच्या निकषांनुसार लाभासाठी पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांना त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमानुसार प्रशिक्षण शुल्क C-DAC संस्थेस अनुज्ञेय राहील. C-CAT पूर्वचाचणी परीक्षेच्या पूर्वतयारीचे शुल्क व सुरक्षा ठेव शुल्क लाभार्थ्याने स्वत: भरायचे आहे. अमृतच्या निकषानुसार पात्र ठरणाऱ्या प्रशिक्षणार्थींना त्यांचे निवासाचे व तदनुषंगाने इतर अनुषंगिक खर्च सुरुवातीस स्वत: करावा. C-DAC संस्थेने याबाबत व्यवस्था केल्यास त्यांनी त्याचे उमेदवारनिहाय देयक सर्व तपशिलासह अमृत कार्यालयास सादर करावे. तदनंतर प्रत्यक्ष खर्चाच्या पुराव्या पृष्ठ्यर्थ दस्तऐवज सादर केल्यावर प्रत्यक्ष मासिक खर्च किंवा जास्तीत जास्त रु.६०००/- (अक्षरी रुपये सहा हजार फक्त) प्रती लाभार्थी प्रतीमहा यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे बहिस्थ उमेदवारांना त्यांचे मागणीनुसार प्रतिपूर्ती निधी अनुज्ञेय राहील व तो त्यांचे आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल.

या योजनेमध्ये, परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच लाभ मिळतो, त्यामुळे अनुत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळण्याचा, प्रश्नच उद्भवत नाही

**२) अमृत – IGTR द्वारे औद्योगिक कौशल्य विकास प्रशिक्षण योजना :**

**योजनेचा उद्देश :** महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना उद्योग अभिमुख रोजगारक्षम प्रशिक्षण देणे

INDO GERMN TOOL ROOM म्हणजे आय. जी. टी. आर. हा जर्मन सरकार, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांचा संयुक्त उपक्रम आहे. याचे मुख्य केंद्र औरंगाबाद येथे आहे आणि उपकेंद्रे पुणे, नागपूर आणि मुंबई येथे. यात तांत्रिक प्रशिक्षण दिले जाते आणि अत्याधुनिक टूलरूम असते, ज्यात एकत्र सी. एन. सी. लेथ मशीन, मिलींग, ई. डी. एम. आणि वायर कटिंग मशीन असतात.

**अमृतचा लक्ष गट :**

महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही त्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षित गटातील उमेदवार जे सदर प्रशिक्षणासाठी निश्चित केलेल्या इतर अर्हता सुद्धा पूर्ण करतात.

**लाभार्थी पात्रता निकष :**

१. अर्जदाराने अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.
२. उमेदवाराचे वय १८ ते ४० वर्षे दरम्यान असावे.
३. निवडलेल्या प्रशिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता.

**अर्ज करण्याची पध्दत :**

१. अमृत व इंडो-जर्मन टूल रुम (IGTR) यांचे संयुक्त विद्यमाने योजनेसाठी अर्ज करण्याचे दृष्टीने अमृतचे संकेतस्थळ www.maha-amrut.org.in/igtr.html वर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतील.
२. उमेदवारांना त्यांच्या अर्हतेनुसार व आवडीनुसार अभ्यासक्रम निवडण्याची मुभा राहील.
३. अर्जदाराने निवडलेल्या कोर्सचे प्रशिक्षण घेण्यासाठी संस्थेने निर्धारित केलेले शैक्षणिक व इतर निकष तसेच, अमृतकडील लाभासाठी अर्जदाराने लाभार्थी पात्रता निकषांची पूर्तता करीत असल्याची खात्री करून त्याबाबत स्वसाक्षांकित दस्तऐवज अपलोड करून

ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा. ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी स्वस्वाक्षरीत दस्तऐवजांसह अमृत संस्थेस विहित मुदतीत पाठवावी.

४. पूर्व निर्धारित समय मर्यादेत प्राप्त परिपूर्ण अर्जांचा प्राप्त क्रमानुसार विचार होईल.

**लाभाचे स्वरूप :**

या प्रशिक्षण योजने अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांना प्रत्यक्ष/थेट लाभ अनुज्ञेय नाही. अमृतने या कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणासाठी प्रायोजित केलेल्या लाभार्थींचे प्रशिक्षण शुल्क, निवास व भोजन शुल्क (जेथे लागू आहे तेथे) तसेच, विमा व वैयक्तिक सुरक्षा साधने (Insurance and Personal Protective Equipments) शुल्क IGTR संस्थेस अदा करण्यात येईल.

एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक लोकांना पण या योजनेचा लाभ घेता येतो .

**३) नव उद्योजकांना प्रोत्साहनासाठी इन्क्यूबेशन सेंटर योजना :**

इनक्युबेशन सेंटर, ही नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन करण्यात येतात, जेथे त्यांना सर्व प्रकारची मदत - तज्ञांचे मार्गदर्शन, तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, मीटिंग हॉल, प्रशासकीय सहाय्य, कार्यालयीन जागा वगैरे बाबतीत केले जाते, महाराष्ट्रात अशी १९ सेन्टर आहेत.

**योजनेचा उद्देश :** महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या उमेदवारांची नवीन कल्पनांच्या माध्यमातून नवउद्योजक बनण्याची इच्छा आहे त्यांना नवव्यवसाय उभारणीस प्रेरणा देणे व मार्गदर्शन करणे.

**लाभार्थी लक्ष गट :**

खुल्या प्रवर्गातील अमृतच्या लक्षित गटातील ज्या जातींना कुठल्याही शासकीय विभाग / संस्था / महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा जातीचे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तरुण नव उद्योजक ज्यांच्या नवनवीन व्यवसाय कल्पनांना अंतिम स्वरूप देवून त्यांच्या नवीन उद्योगांना / व्यवसायास प्रोत्साहन देता येईल असे उमेदवार.

**योजनेसाठी अर्ज करण्याची पध्दत :**

योजनेसाठी निर्धारित शैक्षणिक व तांत्रिक अटी व शर्तीची पूर्तता करणारे अर्जदार यांनी विहित नमुन्यामध्ये अमृतच्या किंवा अमृत संस्थेने योजनेसाठी निश्चित केलेल्या इनक्युबेशन सेंटर यांच्या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. जे उमेदवार तांत्रिक पात्रता फेरीत निवडले जातील त्यांनी अर्जाची हार्ड कॉपी, आवश्यक सर्व कागदपत्रांसह स्व स्वाक्षरीत (Self-Aattested) करून अमृतच्या किंवा अमृतने योजनेसाठी निश्चित केलेल्या इनक्युबेशन सेंटरच्या कार्यालयास तांत्रिक फेरीच्या तारखेला जमा करणे बंधनकारक राहील.

**लाभार्थी पात्रता निकष :**

१. अर्जदार खुल्या प्रवर्गातील अमृतच्या लक्षित गटातील जातीचा तरुण/तरुणी इच्छुक नवोद्योजक असणे आवश्यक आहे.

२. अर्जदाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख पेक्षा कमी असल्याबाबत प्राधिकृत अधिकारी यांचा उत्पन्नाचा वैध दाखला आवश्यक.

३. अर्जदार किमान १२ वी उत्तीर्ण असावा.

४. उमेदवाराचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

५. अर्जदाराकडे स्वत:ची अशी नवीन व्यावसायिक कल्पना / तंत्रज्ञान असणे आवश्यक आहे.

६. योजनांतर्गत प्रोत्साहनपर अर्थसहाय्य कालावधीत उमेदवाराने उद्योजकीय आकांक्षेसाठी पूर्णवेळ पाठपुरावा करणे आवश्यक राहील.

७. अर्जदाराने याच प्रयोजनासाठी राज्य किंवा केंद्र सरकार यांच्या इतर समकक्ष अन्य कोणत्याही योजनांमधून रु.१० लाख (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) पेक्षा जास्तीच्या अर्थसहाय्याचा

लाभ घेतलेला नसावा.

८. उमेदवाराच्या आधार कार्ड व पॅन कार्ड स्वस्वाक्षरीत (Self-Aattested) प्रत.

९. उमेदवाराच्या वैक्तिक आधार संलग्न बँक खात्याचा किंवा त्याच्या कंपनीच्या नावे असलेल्या बँक खात्याचा तपशील (बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, IFSC कोड) देणे आवशयक. उमेदवाराने जर त्याच्या कंपनीच्या नावे असलेल्या बँक खात्याचे तपशील दिले असतील तर त्याप्रसंगी कंपनीच्या अन्य निदेशाकांकडून (Cofounders) ना-हरकत प्रमाणपत्र देणे बंधनकारक

**लाभार्थी निवड प्रक्रिया :**

१. अमृत संस्थेमार्फत व ज्या संस्थेकडून योजना राबविण्यात येईल त्यांचे मार्फत सदर योजनेची वर्तमानपत्रे व सामाजिक माध्यमातून व्यापक प्रसिद्धी करण्यात येईल.

२. अर्जदारांकडून अमृतच्या संकेतस्थळावर अथवा योजना राबवणाऱ्या संस्थेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतील.

३. लाभार्थी निवडीसाठी प्राप्त अर्जांची संबंधित संस्था व अमृत कार्यालयाकडून संयुक्त प्राथमिक छाननी करण्यात येईल.

४. त्यानंतर व्यवसायाच्या नवनवीन कल्पनांच्या तांत्रिक व व्यावहारिक दृष्ट्या योग्यायोग्य त्याबाबत संस्थेच्या तज्ञांचे समितीद्वारे व अमृत संस्थेच्या प्रतिनिधी समवेत छाननी करण्यात येईल.

५. या संयुक्त तांत्रिक व व्यावहारिक छाननीत योग्य ठरणाऱ्या अर्जदारांचे अर्ज सर्व तपशिलासह व कागदपत्रांसह अमृतच्या छाननी निकषानुसार अंतिम छाननीसाठी अमृतच्या छाननी समितीच्या विचारार्थ ठेवण्यात येतील.

६. अमृतच्या निकषानुसार केवळ पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अमृत संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेने संबंधित संस्थेकडे शिफारस करण्यात येतील व निवड झालेल्या उमेदवारांना निवडलेल्या इनक्यूबेशन सेंटर येथे पुढील मार्गदर्शनार्थ प्रायोजित केले जाईल.

**लाभाचे स्वरूप :**

१. निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्यांचे प्रशिक्षण प्रगती अहवालाचे व संस्थेच्या शिफारसीचे आधारे प्रतिंमहा प्रोत्साहनपर अर्थसहाय्य रक्कम रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) फक्त एक वर्षासाठी प्रशिक्षण संस्थेमार्फत त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केले जाईल.

२. इन्क्यूबेशन सेंटर त्यांच्या कडून अमृतच्या लाभार्थ्यांना उपलब्ध होणारे तज्ञांचे मार्गदर्शन, तंत्रज्ञान, सॉफ्ट वेअर, मिटिंग हॉल, कार्यालयीन जागा, प्रशासकीय सहाय्यअशा विविध बाबींसाठी प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिमहा रक्कम रु. ६०००/- (अक्षरी रुपये सहा हजार फक्त) अथवा सदर इनक्युबेशन सेंटर यांच्याकडून आकारली जाणारी प्रत्यक्ष रक्कम यापैकी जे कमी असेल ती रक्कम सदर सेंटरला थेट अदा करण्यात येईल.

३. इन्क्यूबेशन सेंटरकडून त्यांच्याकडील सेवांसाठी आकारली जात असलेली रक्कम रु. ६०००/- पेक्षा जास्त असल्यास उर्वरित रक्कम लाभार्थ्यांनी स्वत: संस्थेस भरावी.

इनक्युबेशन सेंटरच्या प्रशिक्षणात खंड पडल्यास लाभ मिळण्यास उमेदवार प्राप्त नाही.

मला विश्वास आहे की आपले ज्ञातिबांधव या योजनांचा लाभ उठवतील.

**- श्रीकांत शिंत्रे,**

मोबा. ९६१९१९६७०५

# काश्मीर हे नक्की कोणाचे?

काश्मीर हे नक्की कोणाचे? याबद्दल अनेकांना कुतुहल व औत्स्युक्य वाटत असेल. तर काश्मीर आहे काश्यप ऋषींचे ! काश्मीर हे नाव आलेच मुळी काश्यपांपासून. 'काश्यपः मीर' !

संस्कृत भाषेत मीर म्हणजे मोठे सरोवर. काश्यप हे सद्य वैवस्वत मन्वंतरातील सप्तऋषींपैकी एक. काश्यप गोत्री लोक ही काश्यपांची संतती आहे.

प्रजापती दक्षांच्या तेरा कन्यांचा विवाह काश्यपांसोबत झाला होता. देवता, दानव, यक्ष व नाग हे सर्व काश्यपांचीच संतती आहेत.

मेरू पर्वत रांगांमध्ये एक अतिशय विस्तृत व रमणीय सरोवर होते. भगवान शंकर व त्यांच्या अर्धांगिनी सती या दोघांनाही हे सरोवर अतिशय प्रिय असल्यामुळे, हे दोघेही या सरोवरावर नियमित येत असत. काश्यपांनी सतीला हे सरोवर आंदण दिले तेव्हापासून या सरोवराला 'सतीसार' हे नाव पडले.

जलोद्भव नावाच्या दुष्ट दैत्याने या सरोवराचा आश्रय घेऊन परिसरातील लोकांना त्रस्त करून टाकले होते. परिसरातील लोकांनी काश्यप ऋषींना जलोद्भवाच्या क्रौर्याची व आतंकाची माहिती देऊन त्यांना यातून वाचवण्याची प्रार्थना केली. काश्यपांनी त्यांच्या नागवंशीय 'अनंत नाग' नावाच्या मुलाला बोलावून जलोद्भवाचा आतंक संपवण्याची आज्ञा केली. त्यांनी सरोवरातील पाणी सोडून देऊन सरोवर कोरडे करायचे व त्यामुळे उघड्यावर पडलेल्या जलोद्भव दैत्यास भगवान श्री विष्णूंच्या हातून मारावयाची नीती आखली.

याच नीतीनुसार सरोवराच्या पश्चिमेला 'वराहमुख' (सध्याचे बारामुल्ला) नावाची दरी (घाटी) खोदुन त्याद्वारे सरोवरातील सर्व जल सर्व बाजूंना जमिनीने वेढलेल्या सागरात वहावून देण्यात आले. या सागराचे नाव होते 'काश्यप सागर' (सध्याचा कॅस्पियन सी). स्वतःचे जल संरक्षण नाहीसे झाल्याचे बघून जलोद्भव दैत्य सरोवराबाहेर उघड्या मैदानात आला तेव्हा श्री विष्णूंनी त्याचा वध केला.

कोरड्या पडलेल्या या सरोवराच्या ठिकाणी मग वेद उपनिषद आदी शास्त्रांचे अध्ययन केंद्र विकसीत झाले. ज्या जागेत अशा अतिशय समृद्ध संस्कृतीचा उगम व विकास झाला त्या जागेवर वसलेल्या नगराचे नाव आहे 'श्रीनगर'. काश्यपांच्या 'अनंत नाग' नावाच्या मुलाने श्रीनगरच्या बाजूलाच अजून एक शहर वसवले होते जिथे आज 'अनंतनाग' जिल्हाचे मुख्यालय आहे व त्या नगराचे नाव आजदेखील 'अनंतनाग' आहे.

श्रीनगर हे लवकरच भरभराटीस व प्रसिद्धीस आले. देवी गौरी व गणेश हे नियमितपणे इथे येत असत. गौरींच्या येण्याचा मार्ग 'गौरी मार्ग' म्हणजेच आजचे 'गुलमर्ग' म्हणून ओळखले जाते. कल्हणाने 'नीलमत पुराणाच्या' संदर्भाने लिहिलेला 'राजतरंगिणी' हा ग्रंथ काश्मीरच्या इतिहासाचा प्रमाणग्रंथ मानला जातो. जगभरातील विद्वान काश्मीरच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी याच ग्रंथाचा संदर्भासाठी वापर करतात.

ब्रिटीश पुरातत्ववादी एम् ए स्टेन यानी राजतरंगिणीचा तीन खंडांमध्ये सरळ आंग्ल अनुवाद केला आहे.

**काश्मीर नक्की आहे तरी कोणाचे?**

काश्मीर हे काश्मीरची अधिष्ठात्री देवी, देवी शारदेचे आहे.

नमस्ते शारदा देवी, काश्मीरपूरवासिनी,

त्वमहे प्रार्थये नित्यम् विद्यादानीच देहिमे.

शारदादेवीला काश्मीरपुरवासिनी म्हटले आहे. काश्मीरी भाषेच्या लिपीला 'शारदा' म्हटले जात असे व काश्मीरातील अध्ययनाच्या अनेक केंद्रांना 'शारदा पीठ' म्हणत असत. संपूर्ण काश्मीरलाच कधी काळी 'शारद देश' म्हणून ओळखले जायचे.

आठव्या शतकात आद्य शंकराचार्य

काश्मीरला आले तेव्हा काश्मीर हे शैव संप्रदायाचे प्रमुख केंद्र होते. गोपालाद्री पर्वत शिखरावरच आद्य शंकराचार्यांनी शिव व शक्तीच्या एकरूपतेचे वर्णन करणाऱ्या 'सौंदर्य लहरी' ची रचना केली. त्या टेकडीलाच आज 'शंकराचार्य टेकडी' म्हणून ओळखले जाते.

सध्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये असलेल्या कृष्णगंगा नदी काठी असलेल्या शारदा मंदिराचे सौंदर्य बघून शंकराचार्यांना तुंगा नदीच्या तीरावर वसलेल्या शृंगेरी येथे तसेच मंदिर बांधण्याची प्रेरणा मिळाली.

शृंगेरीच्या मंदिरातील शारदेची चंदनाची मूळ काष्ठमूर्ती (विग्रह) काश्मीरमधूनच आणण्यात आली आहे.

आद्य शंकराचार्य आपल्या शिष्यांसहित काश्मीरात फिरत असताना एक प्रसंग घडला. एका काश्मीरी पंडित जोडप्याने शंकराचार्यांना काही दिवसांसाठी त्यांचे आतिथ्य स्वीकारण्याची प्रार्थना केली.

शंकराचार्यांनी त्यांची प्रार्थना मान्य करण्यापूर्वी ते व त्यांचा शिष्य परिवार स्वतःचे अन्न स्वतः शिजवून खातील ही अट घातली. ही अट ऐकून त्या जोडप्याला त्यांच्या आदरातिथ्याबद्दल शंका घेतल्यासारखे वाटले. परंतू त्यांनी ही अट मान्य केली. सायंकाळी पाकसिद्धीसाठी आवश्यक तो शिधा व इंधनादी देऊन यजमान दाम्पत्य निद्रीस्त झालं. परंतू या सर्वांसोबत ते अग्नी प्रज्वलित करण्यासाठी काही सामान द्यायचे विसरले होते. शंकराचार्यांनी त्यांच्या शिष्यांना यजमानांना त्रास देण्याची मनाई केली व त्या रात्री ते काहीही न खाताच झोपले.

दुसऱ्या दिवशी शंकराचार्यांना उपवास घडला हे ऐकल्यावर त्या दाम्पत्यास अतिशय वाईट वाटले.

शिष्यांनी रात्री पाकसिद्धीसाठी वन्हीच उपलब्ध नसल्याचे सांगितले. तेव्हा त्या गृहिणीने थोडे पाणी हातात घेऊन लाकडांवर शिंपडून अग्नी प्रज्वलित केला हे बघून शंकराचार्यांना मोठेच आश्चर्य वाटले. काश्मीरच्या सामान्य जनांकडूनही खूप काही शिकण्यासारखे आहे हे शंकराचार्यांना कळून चुकले होते.

रामानुजाचार्यांनी अकराव्या शतकात काश्मीरला भेट दिली. केवळ काश्मीरातच उपलब्ध असलेल्या 'ब्रह्मसूत्रां'चा अभ्यास करून 'श्रीभाष्य' लिहिले. रामानुजांना तो ग्रंथ ग्रंथालयात केवळ वाचण्यासाठी बघण्याची अनुमती मिळाली होती. तिथे कोणतीही टिपणे काढण्याची त्यांना अनुमती नव्हती.

रामानुजाचार्य व त्यांचे शिष्य कुरूत्थलवर प्रतिदिनी ग्रंथालयात जाऊन अक्षर अन् अक्षर पाठ करून घेत. शारदापीठात परतल्यावर सगळे पाठांतर आठवून त्यांनी ग्रंथरचना केली. असे तीन महिने त्यांनी पाठांतर करून व आठवून 'श्रीभाष्य' ग्रंथ पूर्ण केला. हाच 'श्रीवैष्णवां'चा आद्यग्रंथ आहे.

काश्मीरची अधिष्ठात्री विद्येची देवी श्री शारदा प्रसन्न होवून रामानुजांसमोर प्रकटली व तिने त्यांना हयग्रीवाचे शिल्प आशीर्वाद म्हणून दिले.

**काश्मीर आहे तरी कोणाचे?**

तर काश्मीर आहे भट्ट पंडित व विद्वानांचे.

नीलमत पुराणानुसार काश्मीरला ५१०० वर्षांचा ज्ञात इतिहास आहे. काश्मीरची सगळी लोकसंख्या हिंदू व बौद्ध होती.

जगभर इस्लामी आक्रमक एक एक प्रदेश पादाक्रांत करत असताना लोहाणा वंशाच्या शूर राजांनी भारताच्या पश्चिमी सीमांचे त्यांच्या आक्रमणापासून यशस्वी संरक्षण केले होते. हे लोहाणा प्रभू रामांचे पुत्र राजा लव यांच्या सैन्यातील खड्गवीर होते. आजचे लाहोर हे रामायण काळातील 'लवपुरी' होते.

जे इतिहास विसरतात त्यांच्यावर इतिहासाच्या पुनरावृत्तीचे दुर्भाग्य ओढवते.

**– श्रीपाद जोशी**

विंग कमांडर सुदर्शन यांच्या मूळ इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद

**कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर**

# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२५-२०२६

**(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)**

## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.

८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.

९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी उत्तेजनार्थ बक्षीस**
मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक. **१२. इ. ४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.

१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय)
अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान

१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,

१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्एल्.बी.

१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए.,UPSC, MPSC

१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू. व सी.एस्.(Foundation) **१८.** गरजू, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनी–इ.१० व १२वी

१९. **सभासदांकरिता –** वक्तृत्व, संगीत, पाककृती, नृत्य, गायन, वादन किंवा सर्व क्षेत्रातील कलाकौशल्यासाठी विशेष बक्षिसे **२०. पत्रकारिता –** १. शिक्षण २. विशेष योगदान

**संस्थेकडील विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून आवश्यक ते कागदपत्रे जोडून कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालयात ता. 15 जुलै 2025 पर्यंत जमा करावेत. संघाची कार्यकारिणी तसेच शैक्षणिक समिती पारितोषिकांबाबत योग्य निर्णय घेईल. अर्जदार (पालक) संघाचे सभासद असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.**

## शैक्षणिक अर्थसाहाय्य मागणीसाठी आवाहन !

कळविणेस अत्यंत आनंद होतो की, आपल्या संस्थेकडे सुवर्ण चतुष्कोन निधीसाठी आलेल्या देणग्यांच्या व्याजातून यावर्षी प्रथमच शैक्षणिक अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आपल्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे योजना तयार करण्यात आली आहे.

**शैक्षणिक अर्हता :**

१) उच्च माध्यमिक शिक्षण व सर्व प्रकारचे पदव्युत्तर अभ्यासक्रम.

२) कायदा शिक्षण (एलएल.बी., एलएल.एम.), वाणिज्य (सीए, सीएस, आयसीडब्ल्यूएस)

३) उच्च तंत्रशिक्षण, वैद्यकीय उच्च शिक्षण, कला/वाणिज्य उच्च शिक्षण

४) पदव्युत्तर स्पर्धा परीक्षा (युपीएसी, एमपीएससी किंवा इतर स्पर्धा परीक्षा)

**नियम व अटी :**

१) मदतीची रक्कम येणाऱ्या अर्जांच्या म्हणजेच मागणीच्या प्रमाणात देण्यात येईल.

२) अर्ज कोल्हापूर चित्पावन संघाच्या कार्यालयातून घेऊन ते पूर्ण भरून किंवा आमच्या खाली दिलेल्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घेऊन ते पूर्ण भरून मूळ प्रत कार्यालयात देण्याची आहे व तोच तपशील kolhapurchitpavans@gmail.com या ईमेलवरही पाठवणेचा आहे.

३) अर्ज दोन्ही ठिकाणी पूर्ण भरलेले असल्याशिवाय विचारात घेतले जाणार नाहीत.

४) अर्ज संस्थेच्या संकेतस्थळ www.kolhapurchitpavan.com Click Scholarship tab किंवा www.chitpavanskolhapur.com Click Scholarship tab वरही उपलब्ध आहे. तेथूनही डाऊनलोड करू शकता.

५) अर्ज पूर्णत: किंवा अंशत: स्वीकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

कृपया सदरच्या योजनेचा जास्तीत जास्त ज्ञाती बांधवांनी लाभ घ्यावा, ही विनंती.

# तुमचं आरोग्य सुधारण्यासाठी एक सुवर्णसंधी !

**Transform Your Body, Mind  Energy in One Powerful Session!**
**Guest Speaker: Mahesh pte (Certified Fitness Trainer  Nutritionist)**
**Topic: The Truth bout Fitness, Nutrition  Long-Term Health**

तुम्ही तरुण असाल की ज्यांना Strength वाढवायची आहे ,Working Professional असाल की ज्यांना फिट राहायचं आहे किंवा ५०-६० वयोगटातले आहात की ज्यांना परत एकदा तरुण व्हायचं आहे. हा सेशन खास तुमच्यासाठीच आहे !

**ह्या सेशनमध्ये आपण बघणार आहोत –** (सोपे व परिणामकारक वर्कआउट्स (साधनांशिवाय)

**फिट राहण्यासाठी डाएट च्या खास टिप्स – उपाशी न राहता!**

**Strength, Flexibility, आणि Endurance ह्यांचा समतोल.**

**मानसिक आरोग्यासाठी टिप्स – शांत व निरोगी मनासाठी**

**Weight Loss आणि Muscle Gain ह्यातले समज–गैरसमज**

BONUS: Free Health Checklist + Live Q Session!

**वयोगट – वय 16 पासून पुढे – सीट्स मर्यादित आहेत! आजच आपली नोंदणी करा!**

चला तर मग सगळे फिट आणि निरोगी होऊया, कारण... **Health is the Real Wealth !**

**रविवार, 1 जून 2025, सकाळी 9 वा.**

**स्थळ : कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालय**

### ✻ सस्नेह निमंत्रण ✻

**बुधवार, दि. ४ जून, २०२५ रोजी**
**कोल्हापूर चित्पावन संघाचा**
**'वर्धापन दिन समारंभ'**
**साजरा करण्यात येणार आहे.**
**याप्रसंगी संघाच्या कार्यालयात सकाळी**
**श्री सत्यनारायण महापूजा**
**संपन्न होणार असून दुपारी ४ ते ७ वाजेपर्यंत**
**सर्व सभासद व हितचिंतकांनी**
**कोल्हापूर चित्पावन संघाच्या कार्यालयात येऊन**

**आपले नम्र,**

**केदार जोशी** — कार्यवाह
**मकरंद करंदीकर** — अध्यक्ष
**आणि सर्व संचालक मंडळ सदस्य**

## अभिनंदन !




**'तेजस्विनी महाराष्ट्राची २०२५ पुरस्कार' मिळाल्याबद्दल नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांचे कोल्हापूर चित्पावन संघातर्फे त्रिवार अभिनंदन !**

**महत्त्वाची सूचना : हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने याही वर्षी मराठी महिन्याची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आलेली आहे. सभासदांनी ती संघ कार्यालयातून घेवून जावी, ही विनंती. - अध्यक्ष**

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.